डॉ. बळीराम सदाशिव अग्निहोत्री यांचा जन्म सन- १९१६ साली कार्तिक शुध्द प्रतिपदेला धरणगांव, जिल्हा जळगांव येथे झाला. शालेय शिक्षण पी. आर हायस्कूल, धरणगांव व कॉलेज शिक्षण HPT College, नाशिक येथे झाल्यानंतर त्यांनी SP College मधून संस्कृत विषयांत व HPT कॉलेज मधून तत्वज्ञान विषयांत MA केले. त्यानंतर लोणावळा येथील कैवल्यधाम संस्थेत स्वामी कुलयानंद यांचा सहवास लाभला. व या संस्थेची शिष्यवृत्ती घेउन त्यांनी मुंबई विद्यापीठामार्फत विल्सन कॉलेजचे प्रो. वेलणकर यांच्या मार्गदर्शनाखाली डॉक्टरेट संपादन केली. त्यांचा विषय होता Investigation of Yoga and its Implications found in Vedic literature. या काळात ते कैवल्यधाम येथील विद्यार्थ्यांना योग- तत्वज्ञान शिकवत तर स्वत: अष्टांग योगाचे म्हणजेच आसन प्राणायाम ध्यान, धारणा इत्यादिचे धडे घेत. याच काळांत त्यांनी ज्योतिष शास्त्राचा अभ्यास केला.

त्यानंतर व्यारा (गुजरात) व खांडवा (मध्यप्रदेश) येथे अल्पकाळ अध्यापकाची नोकरी करुन डॉ. अग्निहोत्री जबलपूर हितकारिणी कॉलेज जबलपूर येथे १९५६ साली तत्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून रुजू झाले. तीनच वर्षानंतर बिहार शासनाच्या

शिक्षण खात्याअंतर्गत मिथिला संस्कृत रिसर्च इन्स्टिटयूट येथे प्राध्यापक पदावर रुजू झाले. १९५९ ते १९७५ असा प्रदीर्घ काळ विद्यार्थ्यांना संस्कृत, तत्वज्ञान शिकवणे व रिसर्च साठी गाईडन्स करणे हे त्यांच्या कामाचे स्वरुप होते. या कालावधीत त्यांनी कित्येक ओरिएन्टल कॉन्फरन्सेससाठी जर्नल्स लिहिली. त्यांच्या हाताखाली सतरा विद्यार्थ्यांना डॉक्टरेट मिळाली. याच काळात त्यांचे कादंबरी कथासार हे त्रैमासिक पुस्तक - संस्कृत, इंग्रजी व हिंदी - हे चौखम्बा प्रकाशन वाराणसी यांनी प्रकाशित केले. त्याचप्रमाणे ज्ञानेश्वर त्रैमासिक व इतर मासिकामधून त्यांनी बरेच लिखाण केले.

त्यांच्या वैवाहिक जीवनाची सुरवात लोणावळा येथेच झाली. १९४८ मध्ये देवरुख येथील लीला नामजोशी यांचेशी विवाह झाला. विवाह समयी मॅट्रिक असलेल्या लीला ताईंनी पुढील पाच वर्षात बाहेरन अभ्यास करन BA ची डिग्री पटकावली. दोघांनी मिळून आपल्या तिन्ही मुलांना सुसंस्कारित आणि विद्यासंपन्न केले.
आज त्यांची थोरली मुलगी लीना मेहेंदळे, या IAS असून शासनाच्या प्रधान सचिव पदावर आहेत. शिवाय चिंतनपर लेखनासाठी प्रसिध्द आहेत. दुसरी मुलगी डॉ. छाया कोरडे या

प्रख्यात डॉक्टर आहेत आणि मुलगा डॉ. सतीश अग्निहोत्री हे देखील IAS असून ओरिसा सरकारच्या सचिव पदावर आहेत. डॉ. सतीश यांनी स्त्री-पुरुष सांख्यिक असमतोल, स्त्री विरोधी मानसिकता व आनुषंगित प्रश्न अशा गहन विषयावर डॉक्टरेट मिळवली असून डॉ. अमर्त्य सेन सारखे जगप्रसिध्द अर्थतज्ज्ञांकडून नावाजले गेले आहेत. त्यांच्या पत्नी अनिता या देखील IAS असून शिवाय बंगाली भाषेत लेखिका म्हणून प्रसिध्द आहेत.

डॉ. बळीराम अग्निहोत्री व त्यांच्या पत्नी यांनी मुलांवर संस्कार घडवतांना शिक्षणा बरोबरच चौफेर वाचन व भ्रमण यांचीही गोडी लावली. डॉ. अग्निहोत्री भारतभर फिरले होते व पुढे इंग्लंड येथे सहा महिने राहून येण्याचा योगही त्यांना मिळाला. बिहार सारख्या लांबच्या प्रांतात येणा-या इतर कित्येक महाराष्ट्रीय व दक्षिण भारतीय कुटुंबांना त्यांचे मार्गदर्शन व मैत्री मिळाले. त्यांचा मोठा जिव्हाळा होता. ज्योतिषाच्या व्यासंगामुळे देखील दरभंगा महाराजा व इतर बरेच विद्वान् व उच्च्पदस्थ अधिकारी यांचे येणे - जाणे चालू असायचे. तसेच दरवर्षी उन्हाळयाच्या सुटीत धरणगांवी परत येउन इथेही विद्वानांच्या गाठी भेटी व चर्चा होत असत.

डॉ. बळीराम अग्निहोत्री यांचे वडील धरणगांवी माळी समाजाच्या आग्रहावरुन एकदशीला कीर्तन करीत. ती परंपरा डॉ. अग्निहोत्री यांनी कायम ठेवली. १९६० ते १९९६ अशी तब्बल छत्तीस वर्षे धरणगांव येथे दरवर्षी महिनाभर त्यांचे भगवद्‌गीता, ज्ञानेश्वरी व भागवत धर्म यावर प्रवचन होत असे.

१९७७ मध्ये महाराष्ट्रात परतल्यावर त्यांनी एक वर्ष दापोली येथे नोकरी केली. त्यानंतर धरणगांव व पुणे येथे वास्तव्य केले. या काळांत त्यांची सहा नातवंडे वारंवार कमी अधिक काळ त्यांच्याजवळ रहात. २००१ मध्ये वयाच्या पंच्याऐंशीव्या वर्षी देखील त्याची प्रकृत्ति ठणठणीत व बुध्दि कुशाग्र होती.

इंजिनियरिंगच्या शिक्षणासाठी दोन नातवंडांना चार वर्षे आपल्याकडे ठेऊन घेण्यात त्यांना कुठलाचा त्रास वाटला नाही. याच काळात त्यांनी **पातंजल योगसूत्र, सांख्यकारिका व योगत्रयी** (कठ, श्वेताश्वतर व मांडूक्य उपनिषदांचे तौलनिक विवेचन) ही संस्कृत - मराठी द्वैभाषिक पुस्तके लिहून प्रकशित केली. B.A. व M.A. संस्कृतच्या विद्यार्थ्यांना सुलभतेने या विषयांचे आकलन होण्याच्या दृष्टीने ही पुस्तके लिहिली. त्यानंतर **घ्ब्बुध्दियोग: दि एक्झिबिटरी सरमन्स ऑफ भगवदगीताङ्ङ** हे त्रैमासिक - संस्कृत

- हिंदी - इंग्रजी - दीर्घ विवेचनात्मक पुस्तक - प्रकाशित केले. नैषध चरित्रसार या पुस्तकावरील भाष्य देखील पूर्ण केले. ते प्रकाशनाधीन आहे. त्यानंतर आपल्या खणखणीत आवाजात शुध्द व स्पष्ट उच्चारांसह संपूर्ण भगवद्‌गीतेचे रेकॉर्डिंग केले. त्याची ऑडियो कॅसेट व ऑडियो सीडी उपलब्ध आहेत. यावर आधारित व्हिडियो सीडी देखील पुढे काढण्यांत आली तिचे प्रसारण आस्था व संस्कार चॅनेल्सवर झाले. धरणगांवच्या वास्तव्यांत आकाशवाणी जळगांवने देखील उपनिषद व पुराणांवरील त्यांची व्याख्याने प्रसारित केले आहेत.

या शिवाय डॉ. अग्निहोत्री यांना धरणगांव ते पंढरपूर दोन वर्ष पायी वारी केली. भागवत धर्म आणि कृष्णावर त्यांची परम श्रध्दा होती. भगवद्‌गीता तसेच अनेक स्तोत्र व ग्रंथ त्यांना तोंडपाठ होते. व दैनंदिन चर्चेत सहजगत्या त्यांतील संकल्पनांचा वापर करीत असत. विशेषत: विना मेहनतीचे धन घेऊ नका या ईशावास्योपनिषदातील वचनावर त्यांची दृढ श्रध्दा होती. ज्योतिषाच्या आधारे भविष्य सांगतांना व्यवहारातील सत्य आणि प्रयत्न यांच्याकडे दुर्लक्ष करु नका असेच त्यांचे सांगणे असे. या सर्व चिंतनाला ते भगवद्‌गीतेचा दाखला देत असत.

खाणे आणि खिलवणे यांची फार आवड होती. ते स्वत: उत्कृष्ट स्वयंपाक करीत. सुटीच्या दिवशी दुपारी स्वयंपाक घराचा ताबा घेऊन गोड धोड पदार्थ बनवणे व सर्वांना आग्रहाने खाऊ घालणे हा त्यांचा आवडीचा छंद होता. तसेच विभिन्न भाषा विशेषत: त्यांचे व्याकरण. शिकण्याची हौस होती. ग्रीक, लॅटिन, जर्मन, फ्रांस भाषांची व्याकरण व भाषा या विषयावरील कित्येक पुस्तके त्यांच्या संग्रहात होती. पाश्चिमात्य तत्वज्ञांपैकी कान्ट हा त्यांचा आवडता फिलॉसफर असून कान्टच्या लेखनाचा त्यांनी दांडगा अभ्यास केला होता. या शिवाय शास्त्रीय संगीत ऐकणे आणि क्रिकेट मॅच पहाणे हे ही त्यांचे आवडीचे छंद होते. ज्योतिषाच्या व्यासंगामुळे सर्व थरातील व सर्व वयातील लोकांचा त्यांच्याकडे ओढा होता व त्यांनी देखील कुठलाही भेदभाव न ठेवता सर्वांना भविष्य सूचना तसेच उपचारार्थ मंत्रपठण इत्यादि सांगतांना हातचे राखून ठेवले नाही.

माघ शुध्द पौर्णिमा, सोमवार, दिनांक १३ फेब्रुवारी, २००६ रोजी ब्राह्म मुहुर्तावर पहाटे तीन वाजता त्यांचे निधन झाले तेही किरकोळ सर्दी पडशाचे निमित्त होउन. त्यांना नव्वद वर्षाचे प्रदीर्घ आयुष्य लाभले. नित्यनियमाने योगासने व प्राणायाम करीत

राहिल्याने शेवटपर्यंत सर्व इंद्रिय व्यवहार व्यवस्थित कार्यरत होते. त्यामुळे ते अजूनही आपल्यातून गेले नाहीत असेच वाटते.